नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक : २७/०३/२०२६

पुणे महानगरपालिका
स्थायी समिती
दाखल कार्यपत्रिका

विषय क्र. २०४४त्वर्य

महाराष्ट्र राज्य लॉन टॅनिस संघटना आयोजित महा ओपन ATP चॅलेजर १०० या स्पर्धेचे दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ ते २३ फेब्रुवारी २०२५ आयोजनप्रीत्यर्थ झालेला खर्च २०२५-२६ च्या क्रीडा विभागाकडील RE27A173 या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकामधून महाराष्ट्र राज्य लॉन टॅनिस संघटना या संस्थेस र.रु. १,००,००,०००/- पर्यंत अर्थसहाय्य देणेसाठी पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रीडा/१९०५, दि. १०/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०४५त्वर्य

उप-आयुक्त क्रमांक ४ अंतर्गत हडपसर मुंढवा क्षेत्रीय कार्यालयामधील विविध उद्यानांत हॉर्टीकल्चर विषयक सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S SAIRAJ GREEN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२९५८०००/- पेक्षा १०.३०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २६५३३२६/- अधिक जी.एस.टी. र.रु.४७७५९९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३१३०९२५/- तसेच त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान/१९५२, दि. १३/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०४६त्वर्य

पुणे पेठ, शिवाजी नगर येथील महापौर निवासस्थानामध्ये कराव्या लागणाऱ्या स्थापत्य विषयक दुरुस्तीविषयक कामे करणे या कामाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७(३)(क) अन्वयेच्या तरतुदीनुसार मागविण्यात आलेल्या ३ कोटेशन पैकी सर्वात कमी दराचे ठेकेदार मे.कमलेश सुभाष जडे यांचेकडून त्यांची कोटेशन र.रु.३८,७०,०९९=७४ (८.१८% ने कमी) अधिक जीएसटी र.रु.६,९६,६१८/- अधिक टेस्टिंग चार्जेस र.रु.२५,२२०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४५,९१,९३७=७४ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा न करून उपलब्ध तरतूदीपर्यंत काम करून घेणेस व होणाऱ्या कामाचे बिल अदा करणेस, हि बाब मा.स्थायी समिती मार्फत मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/२०१९, दि. १८/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०४७ त्वर्य

मास्टर प्लॅन नुसार बाणेर सिवेज डीस्ट्रीक्ट (SD-11) झोन क्र.२अंतर्गत रामनदी व सुतारवाडी, पाषाण येथील अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहीन्या बदलणे व त्याठिकाणी नवीन मलवाहीन्या विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SHUBHAM ASHOK KHATODE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१६६८५११४/- पेक्षा ३३.७८९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ११०४७३८०=८३ अधिक जी.एस.टी. र.रु.१९८८५२९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१९६२९१/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.११३१७०/- पर्यंत अशी एकुण र.रु.१३३४५३७०=८३ तसेच त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/२०२७, दि. २४/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०४८ त्वर्य

पुणे मनपाच्या परिमंडळ क्र.१ अंतर्गत स्मशानभूमी मनपा शाळा, दवाखाने इत्यादी ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. THE SMASH ENTERPRISES यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३९९५४५२/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा ३२.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २७१६९०७=३६ अधिक जी.एस.टी. र.रु.४८९०४३/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३२०५९५०=३६ तसेच काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/२०२८, दि. २४/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०४९ त्वर्य

प्रयोगशाळा साहित्ये, सिबीनेट व ट्रयुनेट साईट चिप्स, मायक्रोस्कोप प्रयोगशाळ साहित्ये खरेदी करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी श्री.स्वामी समर्थ एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे असल्याने त्यांचे कडून काम करून घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/२०३३, दि. २५/०३/२०२६ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका अंतर्गत प्रयोगशाळा साहित्ये, सिबिनेट व ट्रयुनेट साईट चिप्स, मायक्रोस्कोप प्रयोगशाळा साहित्ये खरेदी करणे पुरविणेसाठी सन २०२५-२०२६ या कालावधीसाठी निविदेतील अटी व शर्तीस अधिन राहून साहित्ये खरेदी करणेसाठी श्री स्वामी समर्थ एन्टरप्रायझेस यांचेकडून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रातील तक्त्यानुसार प्राप्त झालेल्या रु. ३३,६२,०७१.८५/- तेहतीस लाख बासष्ट हजार एक्काहत्तर रुपये पंच्याऐंशी पैसे फक्त (जीएसटीसह) पर्यंत कमी दराने काम करुन घेणेस, त्याकरीता करारनामा करणेस.

२) सन २०२५-२६ मध्ये सदर कामासाठी 'CE17A242/J6-57 प्रयोगशाळा साहित्ये, क्षयरोग औषधे व विशेष क्षयरोग कक्ष स्थापन करणे" या मान्य अर्थशीर्षकातुन एकुण रक्कम रुपये ३३,६२,०७१.८५/- तेहतीस लाख बासष्ट हजार एक्काहत्तर रुपये पंच्याऐंशी पैसे फक्त (जीएसटीसह) लक्ष पर्यंत देयके अदा करणेस.

विषय क्र. २०५०त्वर्य

बंडगार्डन पाणीपुरवठा विभाग अंतर्गत टँकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SANTOSH WATER TANKER यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१९९९९६४०/- पेक्षा २.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१९५९९६४७=२ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.१९५९९६४७=२ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (२२-०८-२०२५) पासून काम सुरु करणेस, तरतूद उपलब्ध होती परंतु सदर तरतूद टँकरने पाणी पुरवठा करण्याच्या इतर कामांना खर्ची झाली असल्याने सध्या तरतूद उपलब्ध नाही. जा क्र. ७३८६ दि. १२-०२-२०२६ अन्वये वर्गीकरणाने तरतूद उपलब्ध होणेस खात्याने प्रस्ताव सादर केला आहे, वर्गीकरणाने तरतूद उपलब्ध करून घेणेची जबाबदारी खात्याची राहील तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२०३१, दि. २४/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०५१त्वर्य

प्र.क्र.१ मध्ये कै गेनबा तुकाराम म्हस्के दवाखाना (कळस) येथे अद्यावत प्रसूतिगृह विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. NIKHIL NAVALMAL KOTHARI यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२१८३१०/- पेक्षा २१.७८६% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२९९३०८=९८ अधिक जी.एस.टी. र.रु.५९३८७६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.५९४५/- पर्यंत अशी एकुण र.रु.३८९९१२९=९८ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२०३२, दि. २४/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०५२ त्वर्य

प्र क्र २६ स नं ७३ जलतरण तलावाचे उर्वरित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. RAJESH SAMPATRAO KADAM यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३८९१५३/- पेक्षा ३२.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२३,०४,६२४=०४ अधिक जी.एस.टी. र.रु.४१४८३२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.२७,१९,४५६=०४ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२०३७, दि. २५/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०५३त्वर्य

कोंढवा बु.स.नं. ३१ येथील स्मशानभूमी मध्ये विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Kirti Jeevan Gote यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३८१३३८३/- पेक्षा २८.२९०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७३४५७६=९५ अधिक जी.एस.टी. र.रु.४९२२२४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३२२६८००=९५ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा

करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२०३८, दि. २५/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०५४त्वर्य

कोंढवा बु.स.नं.2/1/1 पार्ट लोकनेते गोपीनाथ मुंडे व्यायाम शाळा येथे विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s Pooja construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२३६९६०/- पेक्षा ३१.३३०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९०९५२०=४३ अधिक जी.एस.टी. र.रु.५२३७१४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३४३३२३४=४३ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२०३९, दि. २५/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०५५त्वर्य

कसबा मतदारसंघामध्ये गाडीखाना दवाखाना येथे विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Saileela Construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४४७२२२/- पेक्षा २% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८२७८२७७=५६ अधिक जी.एस.टी. र.रु.१४९००९०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.२१६१८/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.६२६५/- पर्यंत अशी एकुण र.रु.९७९६२५०=५६ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२०४०, दि. २५/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०५६त्वर्य

परिमंडळ क्र ४ अंतर्गत हडपसर क्षेत्रीय कार्यालय, वानवडी रामटेकडी क्षेत्रीय कार्यालय व कोंढवा येवलेवाडी कर्यालय पुणे शहरातील सर्व शाळांमध्ये अग्निशामक यंत्रणेची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. LUMINOSITY INFRA PROJECTS PVT LTD यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३८१२९२१/- पेक्षा १९.५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३०६९४०१=४१ अधिक जी.एस.टी. र.रु.५५२४९२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३६२१८९३=४१ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२०४२, दि. २५/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०५७त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी देवाची उरुळी, फुरसुंगी कचरा डेपो परिसरात व रॅम्पच्या ठिकाणी औषध फवारणीकरिता माशी प्रतिबंध कीटकनाशक व दुर्गंधीनाशक जर्मीक्लीन २००० पुरविणे मे.गिरीराज ट्रेडिंग कंपनी, पुणे यांचेकडून "ब" पाकीट उघडलेल्या दिनांकापासून दि.०५/०३/२०२६ त्यांचाकडून

पु.ग.प. रकमेच्या ०.०१ % कमी दराने म्हणजेच रक्कम रुपये ३९,९९,२००.०४/- (सर्व करासह) पर्यंत कार्यादेश देऊन काम करून घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस, तसेच त्यापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भांडार/२०४६, दि. २७/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०५८त्वर्य

उप-आयुक्त क्रमांक ५ अंतर्गत बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयामधील विविध उद्यानांत हॉर्टीकल्चर विषयक सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. RAVI NURSERY यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२९४९०००/- पेक्षा ४.८३% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८०६५६३=३ अधिक जी.एस.टी. र.रु.५०५१८१/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३३११७४४=३ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान/२०४७, दि. २७/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०५९त्वर्य

कोंढवा बुद्रुक मधील एकादशी हॉटेल यशश्री सो.ते. कात्रज कोंढवा रस्ता दरम्यानचा मुख्य रस्ता १८ मी डी.पी.रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. JAGSONS BUILDCON PVT. LTD. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२१११३०/- पेक्षा १४.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३६२१५७१=८ अधिक जी.एस.टी. र.रु.६५१८८३/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१२५३८/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१७८४५/- पर्यंत अशी एकुण र.रु.४३०३८३७=८ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/२०४८, दि. २७/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०६०त्वर्य

प्र.क्र. ३४ इंडियन ह्यूम पाईप ते सनसिटी रोड पर्यंत डी.पी. रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. JAGSONS BUILDCON PVT. LTD. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३२७५६७२/- पेक्षा २२.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५५१७४८=४९ अधिक जी.एस.टी. र.रु.४५९३१५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६५३७३/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.३२५०५/- पर्यंत अशी एकुण र.रु.३१०८९४१=४९ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/२०४९, दि. २७/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०६१त्वर्य

मास्टर प्लॅन नुसार खराडी सिवेज डिस्ट्रीक (एस डी १५) अंतर्गत खराडी मध्ये प्रिस्टीन ग्रुप दुर्गामाता मंदिर चौक ते तस्कन सोसायटी ते गुलमोहर सिटी गेट ते पवार वस्ती, कल्याणीनगर येथे हरीनगर ते मारी गोल्ड गेट, सायबेज रोड ते कल्याणी नगर पपिंग स्टेशन दरम्यान जुन्या व जीर्ण अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहिन्या बदलणे व त्या ठिकाणी नवीन मोठ्या व्यासाच्या मलवाहीन्या विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s B.N. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२९०००९२९/- पेक्षा ३३.९८% ने

कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१९१४६४१३=३३ अधिक जी.एस.टी. र.रु.३४४६३५४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.७५९४४०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१७८८०/- पर्यंत अशी एकुण र.रु.२३३७००८७=३३ पर्यंत करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/२०५०, दि. २७/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०६२त्वर्य

कर्वे नगर स.नं.२३, सम्राट अशोक विद्यालयाचे शाळेचे उर्वरित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. V K CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२३०५३५३७/- पेक्षा ११.५१% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२०४०००७४=८९ अधिक जी.एस.टी. र.रु.३६७२०१३/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६९६७४८/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.९९३९०/- पर्यंत अशी एकुण र.रु.२४८६८२२५=८९ तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२०५१, दि. २७/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०६३ त्वर्य

भामा आसखेड पाणी पुरवठा प्रकल्पांतर्गत भामा आसखेड धरण येथील जॅकवेल ते कुरुळी येथील जलशुद्धीकरण केंद्र ते लोहगाव येथील डी.वाय.पाटील कॉलेज पर्यंत टाकण्यात आलेल्या जलवाहिनी वरील सर्व व्हॉल्व्ह तसेच जलवाहिनीची तीन वर्षाकरिता देखभाल दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. PRATHAM CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४७३३२१/- पेक्षा ७.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७८,७१,७१५=२१ अधिक जी.एस.टी. र.रु.१४१६९०९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.९२८८६२४=२१ तसेच दि.(०१-०४-२०२६) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु. ०) पर्यंत तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापू/२०५२, दि. २७/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०६४ त्वर्य

छत्रपती शाहू महाराज जलतरण तलाव, सोमवार पेठ पुणे येथे जलतरण तलावाचे स्थापत्य विषयक दुरुस्ती कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S RAJ ENTERPRISES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३८०२०६०/- पेक्षा १९.०१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३०७९२८८=३९ अधिक जी.एस.टी. र.रु.५५४२७२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.५९४५/- पर्यंत अशी एकुण र.रु.३६,३९,५०५=३९ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२०४१, दि. २५/०३/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०६५त्वर्य

मा.सौ.तन्वी प्रशांत दिवेकर व मा.कु.सई प्रशांत थोपटे यांचे दि. २३/०३/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेने स्मार्ट सिटी आणि 'पीएमसी केअर' सारख्या उपक्रमांसाठी केंद्र शासन तसेच इतर राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय संस्थांकडून अनेक पुरस्कार प्राप्त केले आहेत. यामुळे पुण्याची प्रतिमा देश-विदेशात उंचावली आहे. मात्र, याच पालिकेच्या कारभारातील एक अत्यंत गंभीर त्रुटी मुख्य सभेच्या लक्षात आली आहे.

मार्च २०२६ च्या मुख्य सभेतील प्रत्रोत्तरांच्या वेळी उघड झालेल्या माहितीनुसार, पुणे महानगरपालिका मालकीच्या असूनही ७/१२ उताऱ्यावर किंवा मिळकतपत्रिकेवर (Property Card) पुणे मनपाचे नाव नसलेल्या ४,१८८ (चार हजार एकशे अठ्याऐंशी) मिळकती आहेत. पालिकेच्या मालकीच्या चार हजारांहून अधिक मालमत्तांच्या कागदोपत्री नोंदी नसणे, ही अत्यंत भयावह बाब आहे. यामुळे या मालमत्ता अनधिकृत ताब्यात जाण्याचा, त्यांचा गैरवापर होण्याचा, तसेच पालिकेला महसुलापासून वंचित राहावे लागण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

याशिवाय, गेल्या ३ वर्षांपासून पुणे मनपाच्या मालकीच्या मालमत्तांची यादी असलेले संकेतस्थळ बंद असल्याने या मालमत्तांची सद्यस्थिती जाणून घेणे किंवा त्यावर देखरेख ठेवणे प्रशासनाला शक्य होत नाही. पालिकेची स्वतःची मनुष्यबळे या प्रचंड कामासाठी अपुरी पडू शकतात किंवा त्यांच्याकडे विद्यमान जबाबदाऱ्यांमुळे हे काम करण्यासाठी पुरेसा वेळ नसेल. सनदी अधिकाऱ्यांच्या (निवृत्त उपजिल्हाधिकारी/तहसीलदार) तसेच महसूल खात्यातील (नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी) अनुभवी निवृत्त कर्मचार्यांची कार्यपद्धती, महसूल कायदे व नोंदी यावरील पकड यामुळे हे काम वेगाने व अचूकपणे पूर्ण होऊ शकते.

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या परंतु अद्याप ७/१२ उतारे व मिळकतपत्रिकांवर नोंद नसलेल्या ४,१८८ मिळकतींचा मालकी हस्तांतराची (म्यूटेशन) प्रक्रिया त्वरित पूर्ण करण्यासाठी पुढीलप्रमाणे हंगामी विशेष पथक स्थापन करावे त्यानुसार खालील हंगामी भरती करण्यात यावी.

पथकाची रचनाः

1. १ निवृत्त उपजिल्हाधिकारी / तहसीलदार - पथकप्रमुख म्हणून.

2. ३ निवृत्त नायब तहसीलदार - विविध प्रभागांसाठी निरीक्षक म्हणून.

3. १० निवृत्त मंडळ अधिकारी - प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी व नोंदी जुळवण्यासाठी.

कार्यकक्षाः

अ) पालिका आयुक्त कार्यालयाच्या अखत्यारीत काम करणे. या पथकाने पुढील ६ महिन्यांच्या आत सर्व ४,१८८ व भविष्यातील मिळकतींच्या मालकी हस्तांतराची प्रक्रिया पूर्ण करून संबधित महसुली

कार्यालयाकडे अर्ज दाखल करणे व दाखल केलेले अर्ज बाबत पाठपुरवठा करून मिळकतीवर पालिकेचे नाव दाखल करणे

ब) गेल्या ३ वर्षापासून बंद असलेले मालमत्ता व्यवस्थापनाचे संकेतस्थळ त्वरित सुरू करून त्यावर नोंदी अद्ययावत ठेवण्यासाठी या पथकाने माहिती तंत्रज्ञान विभागास मदत करावी.

मानधनः या निवृत्त अधिकाऱ्यांना पालिकेच्या नियमानुसार योग्य ते मानधन व कार्यालयीन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

अहवाल: या पथकाने दर महिन्याला मा. मुख्य सभा, स्थायी समिती व मा. आयुक्त कडे प्रगती अहवाल सादर करावा.

विषय क्र. २०६६त्वर्य

मा.सौ.कोमल सारंग नवले यांचे दि. २३/०३/२०२६ चे पत्र.

वडगाव खुर्द स.नं.१६ मधुकोष सोसायटी कडून ते वडगाव खुर्द स.नं.१० खडकवासल्याकडे चार चाकी व दोन चाकी वाहने जाण्याकरिता अंडरपास आखण्यात यावा.

विषय क्र. २०६७त्वर्य

मा.श्री.बाळा उर्फ प्रमोद प्रेमचंद ओसवाल व मा.सौ.तन्वी प्रशांत दिवेकर यांचे दि. २३/०३/२०२६ चे पत्र.

प्रभाग क्र. ३९ व प्रभाग क्र. २० अप्पर इ. नगर, लोअर इ नगर, सुप्पर इ. नगर, २७६ अप्पर परिसर, अप्पर ओटा विभाग या ठिकाणी गेले अनेक वर्षापूर्वी पुणे म.न.पा. ते पर्वती पायथा, जनता वसाहत, झोपडपट्टी मधील घरे अप्पर इ.नगर बिबवेवाडी येथे ग.व.नी. खात्या अंतर्गत पुनर्वसन करण्यात आली होती. त्यावेळेस ती घरे खरीदी विक्री करता येत होती, त्याला मुख्य सभेची मान्यता घेण्यात आली होती. सदरची घरे विकल्यानंतर पुणे महानगरपालिकेने मुख्यसभेमार्फत केलेल्या धोरणानुसार रहिवासी गाळयाकरिता १०,०००/- व्यावसायिक गाळयाकरिता १५,०००/- रुपये शुल्क घेतल्यानंतर पुणे म.न.पा घर खरेदी करणाऱ्याच्या नावे भाडेपट्टा करीत असे. कालांतराने transfer फी वाढवण्यात आली आणि नव्याने भाडेपट्टा करणे चालू झाले होते. काही दिवसापूर्वी सदरचा transfer प्रस्ताव बंद करण्यात आला. त्यामुळे पुणे मनपाचे करोडो रुपयाचे आर्थिक नुकसान होत आहे.

तरी, अप्पर इ.नगर, लोअर इ नगर, सुप्पर इ. नगर, २७६ अप्पर परिसर, अप्पर ओटा विभाग येथील निवासी घरांचे व व्यावसायिक गाळयांचे योग्य ते धोरण ठरवावे व नव्याने योग्य ते शुल्क आकारून घरे खरेदी विक्री करणाऱ्यांचे नावे घरे transfer करून त्यांचेशी नव्याने भाडेपट्टा करण्यास सुरुवात करावी.

विषय क्र. २०६८ त्वर्य

मा.सौ.वैशाली बनकर व मा.सौ.उज्वला जंगले यांचे दि. २५/०३/२०२६ चे पत्र.

पुणे पेठ हडपसर ससाणे नगर मुख्य रस्त्यावरील न्यू कॅनल वर वाहनांना येजा करण्यासाठी पूर्वी पूल बांधण्यात आलेले होते. या कॅनल वरील तीनही पूल वेगवेगळया लेव्हलला बांधण्यात आले होते. त्यापैकी एक पूल धोकादायक झालेला असून तो नव्याने बांधण्यासाठी पथविभागामार्फत ठेकेदारास वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे.

तथापि, या ठिकाणच्या तीव्र चढामुळे उतारामुळे या पुलावर होणारे अपघात कमी करण्यासाठी या ठिकाणचे जुने जीर्ण सर्व पूल काढून 24 मीटर डीपी प्रमाणे एकच नवीन पूल बांधणे साठी पथविभागामार्फत वर्क ऑर्डर देण्यात आलेल्या ठेकेदाराकडून काम करून घेण्यासाठी मान्यता मिळावी.

विषय क्र. २०६९ त्वर्य
मा.अमोल बालवडकर व मा.सुहास टिंगरे यांचे दि. २७/०३/२०२६ चे पत्र.

पुणे म.न.पा. चा महसूल वाढण्याच्या दृष्टीने Pune metro pillers वरील जाहिरात करणाऱ्या संबंधित Agency कडून पुणे मनपा ने आकाश चिन्ह विभागाच्या माध्यमातून कर आकारणी करावी व ती कर आकारणी करण्यापूर्वी त्या बाबतचे धोरण, आकडेवारी स्थायी समितीपुढे लवकरात लवकर सादर करावी.

विषय क्र. २०७० त्वर्य

बाणेर स.नं.८८+६५ ब, ५४/१, ५४/२, ५४/३ येथे मागासवर्गीय/आदिवासी विद्यार्थिनी महिलांकरीता निवासी शिक्षण केंद्र बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. R. R. DHOTRE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२०८६१३६६/- पेक्षा १३.७८९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१७९८४७९२=२४ अधिक जी.एस.टी. र.रु.३२३७२६३/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.३४५८८८/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.३६६८५/- पर्यंत अशी एकुण र.रु.२१६०४६२८=२४ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत. मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२०३०, दि. २४/०३/२०२६ चे पत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका